# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. एलआयबी १०९६/७५/(८०/९६)/साशि –५.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई –४००-०३२
दिनांक– २२ जानेवारी, १९९८.

वाचावे - १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्र. एलआयबी १०९४/(३५०९)/साशि-५, दिनांक २३ डिसेंबर, १९९४.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवा योजन विभाग
क्र. एलआयबी १०९४/(३५०९)/साशि-५, दिनांक ३० ऑक्टोबर, १९९६.
३) ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे
दिनांक १६–५–१९९७ चे पत्र क्र. ३३/५अ/१८०७

शासन निर्णय :

१) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारती व साधन सामुग्री यासाठी मान्यता) नियम १९७० मधील तरतुदीनुसार राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना विहित कमाल मर्यादेच्या अधीन राहून अनुज्ञेय खर्चाच्या ७५% परिरक्षण अनुदान देण्यात येते. ग्रंथालयातील वाचनीय साहित्य, स्टेशनरी व इतर बाबींवरील खर्चात झालेली वाढ विचारात घेऊन परिरक्षण अनुदानाच्या कमाल मर्यादेत उपरोक्त शासन निर्णयान्वये "अ", "ब", "क" वर्गाच्या ग्रंथालयांच्या कमाल अनुदान मर्यादेत वाढ करून ती दुप्पट करण्यात आली व "ड" वर्ग ग्रंथालयांसाठी ही मर्यादा रु. ५००/- वरून वार्षिक रु. ५,०००/ करण्यात आली. त्यानंतर गेल्या काही वर्षात झालेली दरवाढ आणि सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न विचारात घेऊन शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. आता शासनाने असा निर्णय घेतला की "अ", "ब", "क", व "ड" वर्गाच्या ग्रंथालयांना व फिरत्या ग्रंथालयांच्या प्रत्येक शाखा घटकांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या कमाल मर्यादेत दुप्पट वाढ करून पूर्वीच्या अनुज्ञेय खर्चाच्या ७५ टक्के ऐवजी ९० टक्के परिरक्षण अनुदान देण्यात येईल. अनुदान मर्यादेचे सुधारीत दर दिनांक १–१–१९९८ पासून अंमलात येतील.

२) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना देण्यात येणारे अनुदान मागील वर्षाच्या खर्चावर आधारीत असल्यामुळे दि ३१ मार्च १९९७ पर्यंत मान्यता देण्यात आलेल्या ग्रंथालयांना चालू आर्थिक वर्षापुरते देय परिरक्षण अनुदानाच्या २५% वाढीव तदर्थ अनुदान देय राहील. (परिशिष्ट "अ" सोबत जोडले आहे.) पुढील आर्थिक वर्षी (१९९८-९९) दि. ३१ मार्च, १९९८ रोजी मान्यताप्राप्त असणाऱ्या ग्रंथालयांना परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या कमाल परिरक्षण अनुदानाच्या मर्यादेच्या अधीन राहून निर्धारीत होणाऱ्या अनुज्ञेय अनुदानाइतके वाढीव तदर्थ अनुदान मंजूर करण्यात येईल. वाढीव तदर्थ अनुदानासाठी मान्यताप्राप्त ग्रंथालयांनी खालील अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१) वाढीव अनुदानापैकी ५० टक्के रक्कम ग्रंथालयातील दि. ३१-३-९७ रोजी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर वाढीव वेतन म्हणून खर्च करण्यात यावी. दि. १-१-१९९८ पासून दि. ३१–३–१९९८ पर्यंत सदर रक्कम कर्मचाऱ्यांना दि. ३१–३–१९९७ रोजी मिळालेल्या वेतनाच्या प्रमाणात वाढीव वेतन म्हणून खर्च करावी. वरील प्रमाणे वेतन निश्चिती करून दि. १–१–१९९८ पासून ग्रंथालय कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतन त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत कमी करता येणार नाही.

२) मान्यता प्राप्त ग्रंथालयातील दि ३१–३–१९९७ रोजी सेवेत असलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यास कमी करण्यापूर्वी तसेच कर्मचाऱ्यांच्या पदसंख्येत वाढ करण्यापूर्वी किंवा ती कमी करण्यापूर्वी ग्रंथालयांनी ग्रंथालय संचालकाची अनुमती घेणे आवश्यक राहील.

३) १९९५–९६ पासून सर्व शासनमान्य ग्रंथालयांना अनुज्ञेय खर्चाच्या ५० टक्के रक्कम ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च करणे आवश्यक केले आहे. १९९६–९७ पासून देय होणाऱ्या परिरक्षण अनुदानाचे वेतन व वेतनेतर अशे दोन समान भागात वर्गीकरण करण्यात येऊन ते मिळविण्यासाठी मागील वर्षी उपरोक्त वेतन व वेतनेतर या बाबींवर किमान अनुज्ञेय खर्च करणे आवश्यक केले आहे. ही अनुदान निर्धारण व्यवस्था कायम राहील.

४) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांची पदसंख्या व पदनाम याचा आकृतिबंध परिशिष्ट "ब" प्रमाणे निश्चित करून देण्यात येत आहे. परिशिष्ट "ब" मधील पदसंख्येइतके किमान कर्मचारी ग्रंथालयात असणे आवश्यक आहे.

३) उपरोक्त अटी महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषदा व जिल्हा परिषदांच्या सार्वजनिक ग्रंथालयांना लागू होणार नाहीत.

४) या बाबींवरील खर्च "२२०५ कला व संस्कृती-१०५ सार्वजनिक ग्रंथालये (तीन) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य - (तीन) (ए) (एक) सहाय्यक अनुदाने (२२५०२९८) योजनेतर-ब "२२०५ कला व संस्कृती- १०५ सार्वजनिक ग्रंथालये (तीन) मध्यवर्ती, जिल्हा ग्रंथालये व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (तीन) (बी) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (१) जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य मागणी क्र. डब्ल्यु ४" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व त्याखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

५) सन १९९७-९८ व १९९८-९९ मध्ये वाटप होणाऱ्या तदर्थ अनुदानाच्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे ग्रंथालयांनी सादर करणे आवश्यक राहील.

६) हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ७१५/व्यय-५ दि. ७-११-१९९७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स. भा. चिंदरकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
ग्रंथालय संचालक, म रा. मुंबई
जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
सहाय्यक ग्रंथालय संचालक, पुणे, कोंकण विभाग नवी मुंबई, नागपूर, औरंगाबाद, अमरावती व नाशिक
ग्रंथपाल, शासकीय विभागीय ग्रंथालये, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, रत्नागिरी, अमरावती
ग्रंथपाल, सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालये
अध्यक्ष, राज्य. विभाग व जिल्हा ग्रंथालय संघ.
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई.
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र २, नागपूर
अधिदान व लेखाधिकारी. मुंबई.
मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषाधिकारी / उपकोषागार, नवी मुंबई.
वित्त विभाग / नियोजन विभाग
साशि १ उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
निवड नस्ती साशि ५ / उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

परिशिष्ट 'अ'

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना मंजूर करण्यात येणाऱ्या

# परिरक्षण अनुदानाच्या कमाल दरांचे विवरणपत्र

| ग्रंथालयाचा वर्ग | मध्याची अनुदान मर्यादा | 1997–98 मधील तदर्थ वाढ | 1998–99 पासून विहीत अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|
| अ जिल्हा ग्रंथालये | 1,20,000 | 30,000 | 2,40,000/- |
| अ तालुका ग्रंथालये | 64,000 | 16,000 | 1,28,000/- |
| अ इतर ग्रंथालये | 48,000 | 12,000 | 96,000/- |
| ब जिल्हा ग्रंथालये | 64,000 | 16,000 | 1,28,000/- |
| ब तालुका ग्रंथालये | 48,000 | 12,000 | 96,000/- |
| ब इतर ग्रंथालये | 32,000 | 8,000 | 64,000/- |
| क तालुका ग्रंथालये | 24,000 | 6,000 | 48,000/- |
| क इतर ग्रंथालये | 16,000 | 4,000 | 32,000/- |
| ड इतर ग्रंथालये | 5,000 | 1,250 | 10,000/- |
| फिरती ग्रंथालये | 16,000 [ प्रत्येक शाखा घटकांसाठी रु. 4,000 ] | 4,000 [ प्रत्येक शाखा घटकासाठी रु. 1,000 ] | 32,000/- [ प्रत्येक शाखा घटकासाठी रु. 8,000 ] |

शासन निर्णय क्र. एलआयबी १०९६/७५/(८०/९६)/स[illegible]-५, दिनांक २२ जानेवारी १९९८.

# परिशिष्ट "ब"

## शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या वर्गवारीनुसार कर्मचारी संख्येबाबत विहित आकृतीबंध

| अ. क्र. | जिल्हा 'अ' | | जिल्हा 'ब' आणि तालुका 'अ' | | इतर 'अ' | | तालुका 'ब' | | इतर 'ब' | | तालुका 'क' | | इतर 'क' | | 'ड' | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पदनाम | संख्या | पदनाम | संख्या | पदनाम | संख्या | पदनाम | संख्या | पदनाम | संख्या | पदनाम | संख्या | पदनाम | संख्या | पदनाम | संख्या |
| 1 | ग्रंथालय | 1 | ग्रंथपाल | 1 | ग्रंथपाल | 1 | ग्रंथपाल | 1 | ग्रंथपाल | 1 | ग्रंथपाल | 1 | ग्रंथपाल | 1 | ग्रंथपाल | 1 |
| 2 | सहाय्यक ग्रंथपाल | 1 | सहाय्यक ग्रंथपाल | 1 | सहाय्यक ग्रंथपाल | 1 | लिपीक | 1 | लिपीक | 1 | शिपाई | 1 | शिपाई | 1 | | |
| 3 | निर्गम सहाय्य | | लिपीक | 1 | लिपीक | 1 | शिपाई | 1 | शिपाई | 1 | | | | | | |
| 4 | लिपीक | 1 | शिपाई | 1 | शिपाई | 1 | | | | | | | | | | |
| 5 | शिपाई | 2 | | | | | | | | | | | | | | |
| | एकूण | 6 | एकूण | 4 | एकूण | 4 | एकूण | 3 | एकूण | 3 | एकूण | 2 | एकूण | 2 | एकूण | 1 |